# कार्यालय मुख्य बिजोत्पादन अधिकारी

## मध्यवर्ती प्रात्यक्षिक प्रक्षेत्र, डॉ. पं दे कृ वि., वणी रंभापूर.

जा. क्रं. / मप्राप्र /ता/३६१ /२०२२ दिनांकः

**निविदा सूचना**

प्रती

______________________

______________________

______________________

**विषयः मध्यवर्ती प्रत्यक्षिक प्रक्षेत्र वणी रंभापुर कार्यालय व विविध विभागावरील पेरणी केलेल्या पिकांची वन्य प्राण्यापासुन व जंगली प्राण्यापासुन संरक्षण करण्या करीता कंत्राटी पध्दतीने पिक राखणदार पुरुष मजुर पुरवणे बाबत...**

**संदर्भ** : संशोधन संचालक कार्यालय जा.क्र. संसं./शा.अ./कं.द/403/2022 दि. 8.6.2022 .

**महोदय,**

उपरोक्त संदर्भीय विषयाला अनुसरून सूचित करण्यात येते की, मध्यवर्ती प्रत्यक्षिक प्रक्षेत्र वणी रंभापुर कार्यालय व विविध विभागावरील पेरणी केलेल्या पिकांची वन्य प्राण्यापासुन व जंगली प्राण्यापासुन संरक्षण करण्या करीता कंत्राटी पध्दतीने पिक राखणदार पुरुष मजुर खाजगी तत्वावर लावणे करिता मोहर बंद लिफाफ्यत खालील पत्त्यावर **दिनांक २०/०६/२०२२.** पर्यंत कार्यालयीन वेळेत पाठविणे बाबत खुल्या बाजार पेठेतून दर मागविणे प्रस्तावित आहे. करिता खालील प्रमाणे निविदा मागविण्यात येत आहे.

| अ क्रं | कामाचा तपशील | विद्यापीठाचे प्रस्तावीत दर (रु) प्रती दिन / प्रती राखणदार | निविदा धारकांनी सादर करावयाचे दर (रु) प्रती दिन / प्रती राखणदार | शेरा/वेळ |
|---|---|---|---|---|
| १ | पिक राखणदार पुरुष मजुर पुरवणे बाबत (१० हेक्टर करीता) | रु- ४००/-<br>८ (आठ) तास करिता | | ८ (आठ) तास काम करणे करिता<br>१. सकाळी ८ ते दुपारी ४ वाजेपर्यंत<br>२. दुपारी ४ ते रात्री १२ वाजेपर्यंत<br>३. रात्री १२ ते सकाळी ८ वाजेपर्यंत |

सोबत जोडलेल्या प्र-पत्रात तपशील प्रमाणे दिनांक २०/०६/२०२२ पर्यंत कार्यालयीन वेळेत सीलबंद लीफाफामध्ये संबंधीत दस्तावेजसह खालील दिलेल्या अटी व शर्तीस अनुसरून सादर करावे.

**अटी व शर्ती**

१. निविदा पत्रक कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १०.०० ते दुपारी ४.०० या वेळेस स्वीकारल्या जातील.
२. निविदा / कोटेशन मुख्य बिजोत्पादन अधिकारी यांच्या नावाने सीलबंद लिफाफ्यात पाठवावी.
३. कंत्राटी पध्दतीने पिक राखणदार पुरुष लावण्याची व्यवस्था संबधित निविदा धारकांनी करावी
४. कंत्राटी पध्दतीने पिक राखणदार पुरुष लावण्याची संपूर्ण जबाबदारी संबधित निविदा धारकाची राहील.
५. म.प्रा.प्र वणी रंभापूर कार्यालय व विभागावरील असलेल्या संपूर्ण परिसरातील देखरेख करीत असतांना नुकसान झाल्यास विद्यापीठ प्रशासनाने लागू केलेल्या नुकसान निकषाप्रमाणे नुकसान भरपाई संबधी निविदा धारकाकडून वसूल करण्यात येईल.
६. कंत्राटी पध्दतीने पिक राखणदार पुरुष यांना नुकसान झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबधित निविदा धारकाची राहील.
७. कंत्राटी पध्दतीने पिक राखणदार पुरुष लावतांना शासनाने घालून दिलेल्या अटी व नियमाचे तंतोतत पालन संबधित निविदा धारकाना करावे लागेल.
८. विभागावर कोणताही वाद विवाद निर्माण झाल्यास कोर्ट कचेरीत न जाता त्याबाबतचा अंतिम निर्णय विद्यापीठ विधी विभागाचे अधिकारी /मा. संशोधन संचालक यांच्या समक्ष मिटविला जाईल व अंतिम निर्णय मा. संशोधन संचालक डॉ. पं.दे.कृ.वि, यांचा राहील व तो सर्वाना मान्य करणे बंधनकारक राहील.
९. विभागावर देण्यात आलेले काम पूर्ण करण्यात यावे, कामा बाबत विभागावरून तक्रार आल्यास किंवा काम सोडून गेल्यास सदर कामाचे देयक काढण्यात येणार नाही.
१०. कृषी विद्यापीठ प्रशासन वेळोवेळी निर्देशित केलेल्या नियमाचे पालन करणे निविदा धारकांना बंधनकारक राहील
११. मान्यता देण्यात आलेल्या निविदा धारकांनी देयक सादर करते वेळी बँक खाते क्रमांक बाबतची संपूर्ण माहिती देयक सादर करते वेळी देण्यात यावे .
१२. निविदा सुचनाची छायांकित प्रत कडून निविदा दर सादर करण्यात येऊ नये. तसे केल्यास निविदा रद्द करण्यात येईल.
१३. मान्यता देण्यात आलेल्या निविदा धारकांनी/कंत्राट धारकांनी कामा बाबतचा तसेच कंत्राट कर्मचारांण्या किमान वेतन विमा, संरक्षण, भविष्य निर्वाह निधी, कॅशलेश पद्धतीचा अवलंब व इत्यादी सर्व सुविधा पुरविणे या बाबतचा स्पष्ट उल्लेख कामे पुरविता वेळी देण्यात येणाऱ्या ५००/- स्टंप पेपर वर करारनामा मध्ये द्रेण्यात यावा.

वरील सर्व अटी व शर्ती मान्य असणाऱ्या निविधा धारकांनीच नमूद कामाचे निविदा सादर कराव्यात.

मुख्य बिजोत्पादन अधिकारी २२/६/22
मध्यवर्ती प्रात्यक्षिक प्रक्षेत्र
वणी रंभापूर